**राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

**क्र.मुमाआ/नोंदणी क्र.१९२१/१३/अपील क्र.HQ/१११७/२०१३/०२**
**क्र.मुमाआ/नोंदणी क्र.१९२२/१३/अपील क्र.HQ/१११८/२०१३/०२**
**क्र.मुमाआ/नोंदणी क्र.१९२३/१३/अपील क्र.HQ/१११९/२०१३/०२**
**क्र.मुमाआ/नोंदणी क्र.१९२४/१३/अपील क्र.HQ/११२१/२०१३/०२**
**क्र.मुमाआ/नोंदणी क्र.१९२५/१३/अपील क्र.HQ/११२६/२०१३/०२**
**क्र.मुमाआ/नोंदणी क्र.१९२७/१३/अपील क्र.HQ/११२७/२०१३/०२**
**क्र.मुमाआ/नोंदणी क्र.१९१८/१३/अपील क्र.HQ/११३४/२०१३/०२**
**क्र.मुमाआ/नोंदणी क्र.१९२२/१३/अपील क्र.HQ/११३५/२०१३/०२**
**क्र.मुमाआ/नोंदणी क्र.१९२०/१३/अपील क्र.HQ/११३६/२०१३/०२**

**श्री. बाळू  सित्रा तुंबडा,**
रा. वेहेलपाड, पो. दादडे, ता. विक्रमगड, जि. ठाणे.

**श्री. बाबल्या बाळू तुंबडा,**
रा. वेहेलपाड (ढोयाचापाडा) पो. दादडे,
ता. विक्रमगड, जि. ठाणे.

**श्री. रमेश नवसु खरपडे,**
मु. आकेर (आंब्याचापाडा) पो. कन्हे,
ता. जव्हार, जि. ठाणे.

**श्रीमती कलावंत लाडक्या टोके,**
मु. अनंतनगर, पो. कोगदा, ता. जव्हार, जि. ठाणे.

**श्रीमती राधी लक्ष्मण भसरा,**
मु. अनंतनगर, पो. कोगदा, ता. जव्हार, जि. ठाणे.

**श्री.नवश्या बुधा ढिगारे,**
मु. ढाढरी, पो. दाभेरी, ता. जव्हार, जि. ठाणे.

**श्री. यशवंत सखाराम गरेल,**
मु.वेहेलपाडा, पो. दादडे, ता. विक्रमगड, जि. ठाणे.

**श्री. गणपत जानू पवार,**
मु. हातेरी (कोकण पाडा) पो. जामसर,
ता. जव्हार, जि. ठाणे.

**श्री. सलिम चिमा मोरघा,**
मु.ढाढरी, पो. दाभेरी, ता. जव्हार, जि. ठाणे.

**श्री. धवळू रामजी लोहार,**
मु. अनंतनगर, पो. कोगदे, ता. जव्हार, जि. ठाणे.

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा अपर निवासी उप जिल्हाधिकारी ठाणे,**
मुख्यालय जव्हार, इंडियन गेस्ट हाऊस,
जव्हार शासकीय विश्रागृहासमोर, नाशिक डहाणू रोड,
ता. जव्हार, जि. ठाणे.

**जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार (महसूल),**
अपर जिल्हाधिकारी कार्यालय ठाणे, मुख्यालय,
जव्हार, ता. जव्हार, जि. ठाणे.

**जन माहिती अधिकारी,**
उपविभागीय अधिकारी, जव्हार विभाग,
जव्हार, जि. ठाणे.

**द्वितीय** अपिलाचा दिनांक: २१.०७.२०१३
सुनावणीचा दिनांक : २७.०८.२०१३
अपीलकर्ता : उपस्थित
जन माहिती अधिकारी : उपस्थित
प्रथम अपिलीय प्राधिकारी: अनुपस्थित

| मूळ अर्जाचा दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपिलाचा दिनांक | प्रथम अपिलीय प्राधिकाऱ्याच्या निर्णयाचा/आदेशाचा दिनांक |
|---|---|---|---|
| ०८.०४.२०१३ | १५.०४.२०१३ | १६.०५.२०१३ | २५.०६.२०१३ |

अपीलकर्ता यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम-६(१) नुसार दि. ०८.०४.२०१३ रोजीच्या १० अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडून केंद्र सरकारद्वारे दि. ०६.०९.२०१२ रोजी निर्गमित अनुसूचित जमाती व अन्य पारंपारिक वननिवासी सुधारित नियम २०१२ बाबत माहिती मागविली होती. जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत माहिती न दिल्याने अपीलकर्ता यांनी त्यांच्या दि. १६.०५.२०१३ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या दि. २५.०६.२०१३ च्या आदेशान्वये अपीलकर्ता यांना उपलब्ध माहिती पुरविण्यात यावी असे आदेश देऊन अपील निकाली काढले.

अपीलकर्ता यांना जन माहिती अधिकारी यांनी माहिती दिली नसल्याने अपीलकर्ता यांनी आयोगाकडे प्रस्तुत द्वितीय अपील दि. २१.०७.२०१३ रोजी दाखल केले. अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी, अपिलीय अधिकारी यांना द्वितीय अपिलाच्या अनुषंगाने नोटीस काढून उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले.

आजच्या सुनावणीस अपीलकर्ता व जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

अपीलकर्ता यांनी त्यांच्या दि. ०८.०४.२०१३ च्या दहा अर्जान्वये मागितलेली पूर्ण माहिती अद्याप अपीलकर्ता यांना मिळालेली नसल्याचे सांगितले.

आजच्या सुनावणीत असे स्पष्ट झाले की, १० अपीलकर्ता तसेच १२७२ इतर अर्जदारांना त्यांना अपेक्षित असलेली माहिती देण्यात आलेली नाही. अपीलकर्ते हे आदिवासी असून वनहक्क कायद्यानुसार वनपट्टा मिळण्यासाठी त्यांनी अर्ज दाखल केले होते, या सर्व १२७२ प्रकरणात अर्जदारांना खालील माहिती अपेक्षित होती:-

खालील कागदपत्रांच्या प्रमाणित प्रती द्याव्यात-

क. संदर्भित नियम १२ ए (२) नुसार आपण ग्रामसभेला माझा दावा पुनर्पडताळणीसाठी पाठवला असल्यास, आपले संबंधित पत्र.

ख. आमच्या ग्रामसभेने किंवा जव्हार उपविभागीय समितीने माझ्या दाव्यात बदल करण्याविषयी किंवा दावा निरस्त करण्याविषयी शिफारस केली असल्यास नियम १२ ए (३) नुसार सदर शिफारस.

ग. नियम १२ ए (७) नुसार अंशत: वा पूर्ण फेटाळलेल्या दाव्यांविषयी जिल्हा समितीने दावेदार व ग्रामसभेला पाठवलेले पत्र.

घ. दाव्यापेक्षा कमी क्षेत्र देऊन माझा दावा अंशत: फेटाळण्याच्या अर्धन्यायिक निर्णयाची कारणे माहिती अधिकार कायद्याच्या कलम ४ (१) (क) व (ड) नुसार आपण अबाधित व्यक्तीस पत्राने कळवली असतील. सदर पत्र व पत्राची मी दिलेली पोच.

ङ. माझ्या दाव्यासंबंधी आपण केलेल्या कारवाईचा दैनिक प्रगती अहवाल पुढील नमुन्यात द्यावा.

मात्र, या प्रकरणात जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार (महसूल), अपर जिल्हाधिकारी कार्यालय यांनी ठराविक मसुद्यातील उत्तर अपीलकर्ता यांना दिले असून याबाबत जन माहिती अधिकारी, उपविभागीय अधिकारी, जव्हार विभाग, जव्हार, जि. ठाणे यांच्याकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ६ (३) अन्वये अपीलकर्ता यांचे अर्ज पाठवून देण्यात आले. वास्तविक या प्रकरणात अप्पर जिल्हाधिकारी कार्यालय यांनी देखील आदेश पारित केले असल्याने वस्तुत: जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार (महसूल), अपर जिल्हाधिकारी कार्यालय यांनी जन माहिती अधिकारी, उपविभागीय अधिकारी, जव्हार यांच्याशी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ५ (४) अन्वये समन्वय साधून सर्वच १२७२ प्रकरणांत अर्जदारांना माहिती देणे अपेक्षित होते ते न केल्याने या १२७२ प्रकरणात माहितीच्या अर्जातील परिच्छेद २(घ) मध्ये केल्याप्रमाणे दाव्यापेक्षा कमी क्षेत्र देऊन दावा अंशत: फेटाळण्याच्या अर्धन्यायिक निर्णयाची कारणे माहितीचा अधिकार अधिनियमाच्या कलम ४ (१) (क) व (ड) नुसार अपीलकर्ता यांना कळविणे बंधनकारक असताना जन माहिती अधिकारी यांनी काहीही कार्यवाही केली नाही. यामुळे गरीब आदिवासींना त्यांच्यावर झालेल्या अन्यायाच्या संदर्भात न्याय मिळणे शक्य झालेले नाही. केवळ माहिती न मिळाल्याने ही परिस्थिती उद्भवली आहे हे, प्रथम अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या दि. २५.०६.२०१३ च्या आदेशात नमूद करुन देखील या प्रकरणांत पुढील कारवाई झालेली नाही.

या प्रकरणात जन माहिती अधिकारी तहसिलदार (महसूल), अपर जिल्हाधिकारी कार्यालय ठाणे, मुख्यालय, जव्हार, ता. जव्हार, जि. ठाणे व जन माहिती अधिकारी, उपविभागीय अधिकारी, जव्हार विभाग,

जव्हार, जि. ठाणे यांनी सकृतदर्शनी दुर्लक्ष केले असून माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या तरतूदींचे उल्लंघन केल्याचे स्पष्टपणे दिसते. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ७ (१) प्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी कलम ६ अन्वये माहिती देण्याची विनंती केल्याचा अर्ज मिळाल्यावर, शक्य तितक्या शीघ्रतेने आणि कोणत्याही परिस्थितीत विनंती केल्यापासून ३० दिवसांच्या आत माहिती देणे बंधनकारक आहे. यास्तव, माहितीचा अधिकार अधिनियम कलम-१९(८) (ग) व कलम-२० (१) अन्वये त्यांचेवर शास्ती का लादण्यांत येऊ नये, याचे स्पष्टीकरण दि. १७.०९.२०१३ दुपारी ०१.०० वाजता जन माहिती अधिकारी यांनी स्वत: उपस्थित राहून सादर करावे. ते उपस्थित न राहिल्यास त्यांना या शास्तीबाबत काहीही म्हणावयाचे नाही, असे गृहीत धरुन त्यांचेवर शास्ती लादण्यांत येईल. तसेच त्यांचेविरुध्द शिस्तभंगाची कारवाई माहितीचा अधिकार अधिनियमाच्या कलम-२०(२)प्रमाणे देखील प्रस्तावित करण्यांत येईल.

तसेच या प्रकरणात गरीब आदिवासी यांना माहिती मिळण्यास विलंब झाल्याने झालेल्या हानीप्रीत्यर्थ माहितीचा अधिकार अधिनियमाच्या कलम- १९ (८) (ख) नुसार प्रत्येक अपीलकर्ता यांना रुपये २०००/- नुकसान भरपाई देण्यात यावी असे आदेश अपर जिल्हाधिकारी कार्यालय ठाणे, मुख्यालय, जव्हार, ता. जव्हार, जि. ठाणे यांना देण्यात येत आहेत.

असे आदेश देण्यात येतात की, १० अपीलकर्ता तसेच १२७२ पैकी उर्वरित अर्जदार यांना खालील प्रपत्राप्रमाणे माहिती दि. ३१.१०.२०१३ पर्यंत देण्यात यावी.

| अ. क्र. | वनहक्क दावेदाराचे नाव | ग्राम सभेने तपासलेले पुरावे | ग्राम सभेने मंजूर केलेले क्षेत्र | उप विभागीय समितीने तपासलेले पुरावे | मंजूर केलेले क्षेत्र | ग्राम सभेने मंजूर केलेल्या क्षेत्रापेक्षा क्षेत्र कमी असल्यास त्याकरिता असलेली कारणे | दावेदाराला कारणे कळवणारे पत्र पाठवल्याचे तारीख |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | | | | | | | |
| २ | | | | | | | |

तसेच असे आदेश देण्यात येतात की, अप्पर जिल्हाधिकारी कार्यालय, ठाणे, मुख्यालय, जव्हार, ता. जव्हार, जि. ठाणे यांनी माहितीचा अधिकार अधिनियमाच्या कलम ४ (१) (सी) व (डी) अन्वये या प्रकरणातील घेतलेले निर्णय व निर्णयाबाबतची कार्यवाही त्यांच्या संकेतस्थळावर तसेच उपविभागीय व अप्पर जिल्हाधिकारी कार्यालयाच्या नोटीस बोर्डवर लावीवी.

माहितीचा अधिकार अधिनियमाच्या कलम ४ (१) (सी) व (डी) अन्वये असे आदेश देण्यात येतात की, प्रधान सचिव, महसुल व वने विभाग (वने), मंत्रालय, मुंबई ४०० ०३२ यांनी सर्व संबंधित जिल्हाधिकारी व उपविभागीय अधिकारी यांच्या कार्यालयातील संकेतस्थळावर व नोटीस बोर्डावर वरील प्रपत्राप्रमाणे माहिती

त्वरित ठेवावी. ही सर्व माहिती दि. ०१.०४.२०११ तारखेपासून संकलित करुन संकेतस्थळावर उपलब्ध करावी व यापुढे देखील दर महिन्याला सदरची माहिती अद्ययावत करुन संकेतस्थळावर ठेवावी.

वरील अपिले निकाली काढण्यात येत असली तरी या प्रकरणात दि. ३१.१०.२०१२ पर्यंत कार्यवाही न झाल्यास अपीलकर्ता पुनश्च माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १८ नुसार तक्रार करु शकतात व तशी तक्रार आल्यास गंभीर दखल घेण्यात येईल याची नोंद सर्व सबंधितांनी घ्यावी.

**आदेश**

**वरील १० ही अपिले निकाली काढण्यात येत आहेत.**

**( रत्नाकर गायकवाड )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मुंबई**
**दिनांक : २७.०८.२०१३**

प्रत,

प्रधान सचिव, महसूल व वन विभाग (वने), मंत्रालय, मुंबई यांना माहिती तथा उचित कार्यवाहीसाठी अग्रेषित.

अपर जिल्हाधिकारी, अपर जिल्हाधिकारी कार्यालय, ठाणे, मुख्यालय, जव्हार, ता. जव्हार, जि. ठाणे यांना माहिती तथा उचित कार्यवाहीसाठी अग्रेषित.